ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - II APRIL - JUNE - 2020

MARATHI PART - III / Hindi Part - I

**Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **“AJANTA”**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** **(www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka,
Dhaka 1000, Bangladesh.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast,
Locked Bag 4, Maroochydore DC,
Queensland, 4558 Australia.

**Dr. Ashaf Fetoh Eata**
College of Art's and Science
Salmau Bin Adbul Aziz University. KAS

**Dr. Nicholas Loannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,
Faculty of Computing, North Campus,
London Metropolitan University, 166-220 Holloway Road,
London, N7 8DB, UK.

**Muhammad Mezbah-ul-Islam**
Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of
Information Science and Library Management
University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh.

**Dr. Meenu Maheshwari**
Assit. Prof. & Former Head Dept.
of Commerce & Management
University of Kota, Kota.

**Dr. S. Sampath**
Prof. of Statistics University of Madras
Chennari 600005.

**Dr. D. H. Malini Srinivasa Rao**
M.B.A., Ph.D., FDP (IIMA)
Assit. Prof. Dept. of Management
Pondicherry University
Karaikal - 609605.

**Dr. S. K. Omanwar**
Professor and Head, Physics,
Sat Gadge Baba Amravati
University, Amravati.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental
Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar
University Raebareily Road, Lucknow.

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerece, Nirzwa College
of Technology, Nizwa Oman.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head,
Dept. of Psychology,
University of Madras.

**Prof. Joyanta Borbora**
Head Dept. of Sociology,
University, Dibrugarh.

**Dr. Walmik Sarwade**
HOD Dept. of Commerce
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad.

**Dr. Manoj Dixit**
Professor and Head,
Department of Public Administration Director,
Institute of Tourism Studies,
Lucknow University, Lucknow.

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head,
Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. P. Vitthal**
School of Language and Literature
Marathi Dept. Swami Ramanand
Teerth Marathwada University, Nanded.

# EDITORIAL BOARD


**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

**Dr. R. K. Ippar**
Principal, Vaidyanath College, Parli-Vaijnath.

**Dr. V. J. Chavan**
Vice-Principal, Vaidyanath College, Parli-Vaijnath.

**Dr. J. V. Jagatkar**
Vice-Principal
Vaidyanath College, Parli-Vaijnath.

**Dr. B.K. Shep**
Vaidyanath College, Parli-Vaijnath.

**Dr. V. B. Gaikwad**
Vaidyanath College, Parli-Vaijnath.

**Dr. R. D. Rathod**
Vaidyanath College, Parli-Vaijnath.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची धर्मांतर घोषणा ते धम्मक्रांती : ऐतिहासिक महत्व<br>**प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे** | १-४ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जातिविषयक विचार<br>**प्रा. डॉ. अंजली जोशी-टेंभुर्णीकर** | ५-११ |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार आणि कार्य<br>**डॉ. प्रा. सौ. एस. पी. लाखे** | १२-१९ |
| ४ | वर्तमान काळातील आंबेडकरी चळवळ आणि राजकारण विशेष संदर्भ - वंचित बहुजन आघाडी<br>**प्रा. डॉ. माधव केरबा वाघमारे** | २०-२४ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय आणि आर्थिक विचार<br>**प्रा. सोनवळकर रमेश शंकरराव** | २५-३२ |
| ६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक क्रांतीची प्रेरणा : बहिष्कृत हितकरणी सभा<br>**लतीका पंकज पाटील** | ३३-४० |
| ७ | भारतातील विद्युतुत विकासासचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>**प्रा. डॉ. सुरवसे एन. पी.** | ४१-४५ |
| ८ | गोपीनाथ मुंडे यांचा जीवन संघर्ष आणि सामाजिक विकासाच्या सर्वांगीण संकल्पना<br>**प्रा. डॉ. गंगाधर कायदे पाटील** | ४६-५४ |
| ९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि महिलान्नोती<br>**डॉ. भारत एम. राठोड** | ५५-६० |
| १० | डॉ. बाबसाहेबांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. मुजीब एम. सय्यद** | ६१-६२ |
| ११ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांबाबतचे कार्य<br>**प्रा. कोने दिलीप महादू** | ६३-६६ |
| १२ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक धोरण<br>**प्रा. सरला ब्रम्हदेव चव्हाण** | ६७-७१ |
| १३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेती विषय विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. सुरेश मनोहर नांदे** | ७२-७७ |

# CONTENTS OF MARATHI PART - III



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महात्मा गांधी यांचे आर्थिक राजकीय विचार आणि सद्यस्थितीतील भारतीय लोकशाही<br>**प्रा. डॉ. संदीप अ. बनसोडे** | ७८-८१ |
| १५ | असहकार चळवळीत महात्मा गांधीची भूमिका<br>**श्री. तोंदुलवार गंगाधर लालू** | ८२-८५ |
| १६ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मार्क्सवादाबद्दल विचार<br>**प्रा. निकम मनोहर सुभाष** | ८६-९२ |
| १७ | महात्मा गांधीजीचा शिक्षणविषयक दृष्टिकोन<br>**प्रा. डॉ. भिम गणपतराव माने** | ९३-९६ |

# CONTENTS OF HINDI PART - I



| अ.क्र. | लेख और लेखक का नाम | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबा साहब अंबेडकर जी का महिला सशक्तिकरण में योगदान<br>**देवेंद्र द्वर्ग** | १-४ |
| २ | डॉ. आम्बेडकर भारतीय महिला सशक्तिकरण क्रांति के मसीहा<br>**डॉ. जयंत कुमार विवेकानंद रामटेके** | ५-११ |
| ३ | डॉ. बाबासाहेब अम्बेडकर : कोयला खानों के श्रमिकों लिए कार्य<br>**डॉ. जितेंद्र सावजी तागडे** | १२-१७ |
| ४ | डॉ. भीमराव अंबेडकर एक सामाजिक सुधारक, दर्शनिक, अर्थशास्त्री<br>**डॉ. ममता धाकड** | १८-२१ |
| ५ | अम्बेडकर और महिला सशक्तिकरण / स्वतंत्रता<br>**संजय कुमार जांगडे** | २२-२५ |
| ६ | डॉ. अम्बेडकर : समाज एवं संविधान निर्माता<br>**डॉ. मो. सईद आलम** | २६-३१ |
| ७ | डॉ. भीमराव अम्बेडकर एवं स्त्री विमर्श<br>**डॉ. रश्मि चौधरी** | ३२-३६ |
| ८ | डॉ. अम्बेडकर और हिन्दू<br>**Dr. Reena Tiwari** | ३७-३८ |
| ९ | डॉ. आंबेडकर के विचार और कृषि पर काम<br>**संयुक्ता कचेर**<br>**प्रो. सी. बी. सिंह** | ३९-४२ |
| १० | डॉ. बाबासाहेब अम्बेडकर के विचारों में नारी चिंतन<br>**डॉ. सुलक्षणा जाधव-घुमरे** | ४३-४६ |
| ११ | रूपनारायण सोनकर के साहित्य पर अम्बेडकरवादी विचारधारा का प्रभाव<br>**डॉ. उत्तम राजाराम आळतेकर** | ४७-५१ |
| १२ | महिला के लिए 'मूकनायक' और 'बहिष्कृत भारत' का महत्त्वपूर्ण योगदान<br>**Dr. Ranjana Appasaheb Kamalakar** | ५२-५४ |
| १३ | डॉ. भीमराव अम्बेडकर : सामाजिक दर्शन<br>**सुजीत कुमार** | ५५-५७ |
| १४ | स्त्रियों के उत्थान में डॉ. बाबासाहेब आंबेडकर का योगदान<br>**प्रा. सुषमा नरांजे** | ५८-६२ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मार्क्सवादाबद्दल विचार

**प्रा. निकम मनोहर सुभाष**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

कार्ल मार्क्सच्या साम्यवादी तत्वज्ञानाने विसाव्या शतकात संपूर्ण जगातील विद्वानांना आपल्याकडे आकर्षित करून घेतले. कामगार, शेतकरी, कष्टकरी, क्रांतीकारी तरूण यांचा एक मोठा आधार हे तत्वज्ञान बनले होते. जगाच्या मोठया भूभागावर साम्यवादी सत्ता आस्तित्वात आल्या. जनसामान्यांच्या प्रश्नांचा,यातनांचा,गुलामगीरीचा आणि संघर्षाचा एक ऐतिहासिक शोध घेऊन त्यांच्या सुटकेचे उपाय सांगणारे आणि वर्ग विषमता नाकारणाऱ्या हया तत्त्वज्ञानाकडे भारताचा एक मोठा तरूण आणि विचारवंत वर्ग आकर्षित झाला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमोर दलितांच्या उद्धाराचा आणि अस्पृश्यता नष्ट करण्याचा मोठा प्रश्न होता. बाबासाहेबांनी मोठया गांभीर्याने मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास आणि चिंतन केले होते. मार्क्सवाद क्रांतीकारी तत्त्वज्ञान असूनही बाबासाहेबांनी त्यास बाजुस सारून बौध्द धर्म का स्वीकारला ? याचे उत्तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या बुद्ध आणि कार्ल मार्क्स या पुस्तकात दोन्हींची तुलना करून दिले आहे. इतकी वर्ष झाल्यानंतरही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी एका धर्माला दुसरा पर्यायी धर्म शोधण्यापेक्षा धर्मच का नाकारला नाही ? हा एक मोठा प्रश्न उभा राहतो मग त्यापेक्षा मार्क्सवादी तत्त्वज्ञान आपल्या बहुसंख्य दलित बांधवांच्या हाती वारसा म्हणून देऊन जमले नसते का ? असे प्रश्न वजा उत्तर पुढे येऊ शकते.

आंबेडकरांच्या विचारांवर व आंबेडकरवादावर रावसाहेब कसबे, कॉ.शरद पाटील, गेल ऑम्व्हेट, प्रभाकर वैद्य सारख्या विद्वानांनी विस्तृत लेखन व चर्चा केली आहे. परंतू याठिकाणी सदर विषयाला फक्त बाबासाहेबांनी बौद्ध धर्माच्या स्वीकाराच्या अनुषंगाने केलेली मार्क्सवादाशी तुलना याची चिकित्सा करणे ही मर्यादा आहे. बाबासाहेबांची नेमकी भूमिका बौद्ध धर्म स्वीकारामागे काय होती हे तपासून पाहताना मार्क्सवाद खरच त्यांनी आपल्या आयुष्यातून बाजुला सारला होता का ? याचीही चिकीत्सा करणे आवश्यक ठरते. समतेचा एक महत्तम समर्थक म्हणून गौतम बुद्धाकडे बघताना कार्ल मार्क्सचे तत्तज्ञानही त्याच दिशेने वाटचाल करीत होते,याची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना पुर्णपणे असूनही व्यवहाराच्या पातळीवर मात्र त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. हे ऐतिहासिक सत्य आणि मर्मही समजून घेणे आजच्या काळात आवश्यक आहे.

मार्क्सवादाशी बौद्धधर्माची तुलना करताना केवळ बौद्ध धर्माला उंचीवर नेऊन ठेवणे एवढा संकूचित अर्थ बाबासाहेबांचा यामागे नव्हता. बारकाईने दोन्हींचा आढावा घेताना वास्तवाच्या कसोटीवर ते घासून बघतात. मर्यादा, बलस्थाने आणि साम्यस्थळे यांच्याकडे न्यायबुद्धीने लक्ष पुरवितात. बाबासाहेबांच्या मते केवळ फक्त समाजवाद प्रतिपादण्यात मार्क्सला रस नव्हता तर तो कसा वैज्ञानिक होता हे सिद्ध करण्यात मार्क्सला आधिक रस होता. त्याचा विरोध हा फक्त भांडवलदारांनाच नाहीतर त्याबरोबर रक्तरंजित किंवा अव्यावहारिक समाजवादाविरूद्धही होता. ही कार्ल मार्क्सची व्यावहारिक भूमिका साम्यवाद अंमलात आणताना स्पष्ट करताना बाबासाहेब तत्कालिन आणि इतिहासातील घटनांच्या अनुषंगाने म्हणतात की 'समाजवाद हा अटळ आहे' हा मार्क्सवादी दावा पूर्णपणे फोल ठरला

आहे.[1] याठिकाणी बाबासाहेबांच्या मांडणीवरून एक गोष्ट स्पष्ट होते की, भुतकाळातील व त्यांच्या काळात साम्यवादाच्या प्रभावाने घडणाऱ्या घटनांवर त्यांचे बारकाईने लक्ष होते. याबरोबर साम्यवादी सरकारांना आलेल्या यशाअपयशाचे त्यांनी बारकाईने चिंतन केले होते. साम्यवादाकडून त्यांच्याही अपेक्षा असणार ज्यांना गेलेला तडा यानिमित्ताने आपल्याला जाणवतो.

रावसाहेब कसबे यांच्या आंबेडकर आणि मार्क्स या पुस्तकातील विचार ध्यानात घेतले तर काही गोष्टींचा याबाबतीत उलगडा होतो आणि बाबासाहेबांच्या भारतीय साम्यवादींकडून असणाऱ्या साधारण अपेक्षा लक्षात येतात. कम्यनिस्ट चळवळीची उदयापासून असणारी उदासिनता बाबासाहेबांना जाणवली होती. आपल्या भाषणातून बाबासाहेबांनी साम्यवाद्यांना आवाहन करताना म्हटले होते की, 'भारतातील समाजवादी समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणार की नाही ? अर्थात हे त्यांचे आवाहन भारतातील अस्पृश्यता, जातीव्यवस्थेच्या प्रश्नांकडे मार्क्सवाद्यांचे लक्ष वेधून घेण्यासाठी होते.[2] बाबासाहेब जेवढया पोटतिढकीने आणि गांभीर्याने बघत होते तेवढे मार्क्सवाद्यांकडून बघितले जावे अशी एक माफक अपेक्षा त्यांची होती. जातीव्यवस्थेसारख्या गंभीर प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्सवादींची संमती ही नक्कीच अस्पृश्यता विरोधी आंदोलनाची ताकद वाढविणारी ठरली असती.

साम्यवादी क्रांतीसाठी होणारी हिंसा हा अनेकांच्या चिंतेचा आणि वादाचा विषय होऊन बसतो. याबाबतीत बाबासाहेब चिकीत्सक नजरेने रशियातील साम्यवादी क्रांतीच्या घटनेकडे बघतात. त्यांच्या मते मानवी प्रयत्नाशिवाय तेथे क्रांती झाली नाही. उलट तेथे साम्यवादाच्या निर्मितीसाठी भरपुर हिंसा व रक्तपात घडविण्यासाठी जाणीवपूर्वक योजना आखावी लागली. तेथे सहज साम्यवाद आस्तित्वात आला नाही. पुढे जाऊन बाबासाहेब टिकात्मक भूमिका घेताना रशियाच्या उरलेल्या जगात साम्यवादी क्रांतीला आणण्याच्या विचारांना दिवास्वप्ने बघणे म्हणतात. याबरोबर ते पुढे नमूद करतात इतिहास घडण्याचे कारण म्हणून आर्थिक स्पष्टीकरण आणि कामगारांना मोठया प्रमाणात भिकेस लावले गेले ही कारणे कोणीही मान्य करणार नाही.[3] यावरून तत्व म्हणून किंवा काळया दगडावरची रेघ म्हणून मानण्यात येणाऱ्या काही नियमांना आणि गृहितकांना बाबासाहेब नाकारतांना दिसतात.

डॉ.बाबासाहेबांना मार्क्सच्या काही महत्वाची विचारांनी आकर्षित केले होते. त्याची दखलही त्यांनी घेतली. त्या चार महत्वाच्या बाबी म्हणजे 1) जगाची पुनर्रचना करणे हे तत्वज्ञानाचे कार्य आहे. 2) हितसंबंधाच्या बाबतीत वर्गावर्गात कलह आहे. 3) एक वर्ग सत्तेवर आणि दुसरा वर्ग हा पिळवणुकीचा बळी खाजगी संपत्तींमूळे होतो. 4) खाजगी संपत्तीचे आस्तित्व नष्ट करून समाजाचे भले होणार.[4] या चार बाबी अजुनही महत्वाच्या आणि काळाच्या कसोटीवर घासून पाहिल्यास मान्य होणाऱ्या व स्पष्ट होणाऱ्याही आहेत. यामूळे बाबासाहेबांना या गोष्टी मार्क्सकडून मांडलेल्या अत्यंत महत्वाच्या वाटतात.

गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स यांची तुलना करताना बाबासाहेब दोन्हींच्या काही समान मुद्यांवर प्रकाश टाकतात. त्यांच्या मते दुःखाचा अर्थ जर पिळवणूक असा घेतला तर बुध्द व कार्ल मार्क्स यांच्यात अंतर नाही. भाषा वेगळी पण अर्थ मात्र तोच आहे.[5] पिळवणुक केल्याने दुःख होते किंवा दुःखामागे पिळवणुकच असते का ? का दुःख आणि पिळवणुक एकाच नाण्यांच्या दोन बाजु आहेत ? असे प्रश्न पटकन मनात येऊ शकतील.याचे निराकरण आवश्यक ठरेल.

बुद्धाने सांगितलेली मानवी दुःख आणि मार्क्सकडून मांडली गेलेली मानवी पिळवणूक हया दोन्ही गोष्टी मुळातच सारख्या नाहीत असा आक्षेप नलिनी पंडीत यांच्याकडून घेतला गेला. अर्थात यास कॉ.शरद पाटील यांनी साधार खोडून काढताना मांडले की, बुद्ध व त्याचे भिक्षु भिक्षुणी हे संघदास मालक उपासकांना दास्यमुक्तीचा उपदेश करीत, दासप्रथेवर आधारलेल्या वर्णव्यवस्थेच्या अंताचा उपदेश करीत. त्यांना यातून पिळवणूकजन्य दुःखाशी असलेला संबंध दाखवायचा आहे.[6] त्यांनी मांडलेला वरील तर्क नक्कीच सत्य उलगडणारा आहे.

'वर्गकलह' या मुद्याच्या बाबतीत बाबासाहेब गौतम बुध्द आणि कार्ल मार्क्सच्या साम्यता दर्शक काही बाबी पुढे ठेवतात. त्यांच्या मते गौतम बुध्दाचा दृष्टिकोन आणि त्यांनी अवलंबलेला अष्टांग मार्गाचा सिद्धांत हा वर्गकलह आस्तित्वात आहे वा वर्गकलह हेच दुःखाचे कारण आहे, यास मान्यता देतो. आनंद आणि बुद्धात झालेल्या बुद्धाच्या संवादात धन लालसा आणि हाव असण्याचे कारण हे खाजगी मालकी हे पुढे येते.[7] अर्थात बाबासाहेबांनी हा मुद्दा तत्कालिन बौद्धकालीन घटनांवरून व विचारांवरून स्पष्ट केल्याने या बाबतीत शंका घ्यायला कारण नाही. कुठल्याही गोष्टीची मालकी ही माणसात स्वार्थीपणा, गर्व तर निर्माण करतेच पण नसऱ्यांकडे हेवा,दुस्वास, लाचारी आणण्याचे काम करते आणि तीच मालकी नंतर असणारे आणि नसणारे यांच्यात वर्गकलह उभा करते हे स्पष्टच आहे.

बाबासाहेब पुढच्या महत्वाच्या समानतेवर प्रकाश टाकताना भिख्खु संघाच्या नियमांकडे लक्ष वळवितात. ज्यात भिख्खुंना वापरण्यासाठीच्या अत्यआवश्यक वस्तूंच्या बाबतीत मर्यादा घालण्यात आली आहे.या वस्तूंशिवाय आणखी काही त्यांनी विकत घेऊ नये म्हणून त्यांना सोने आणि चांदी घेण्यास बंदी होती.भौतिक साधने पूर्णपणे टाळलेली यादी आणि नियमांची तुलना ते रशियातील साम्यवादी नियमांशी करतात आणि याबाबतीत त्यांना बौध्द संघाचे नियम त्यापेक्षा अधिक कठोर वाटतात.[8]

बौद्ध भिख्खुंच्या आदर्श नियमांची बाबतीत समानतेची दखल प्रभाकर वैद्य यांनी घेतली आहे .ते बाबासाहेबांचे विचार स्पष्ट करत मांडतात, अडीच हजार वर्षानंतर मार्क्सने बुद्धाने उभे केलेले आदर्श चित्र प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करून साम्यवादी क्रांतीचा कालखंड सुरू केला. बुद्धाच्या आशिया खंडातील प्रसारासारखेच ते मार्क्सवादाच्या आशिया आणि युरोपातील प्रसाराला मानतात आणि यामागे आदर्श समाजसेवकांची भिख्खुंसारखी संघटना कारणीभूत मानतात. [9]

बुध्द आणि मार्क्समध्ये भेद हा बाबासाहेब साधनांच्या बाबतीत मानतात. त्यांच्या मते बुध्दाने साम्यवाद घडविण्यासाठी सांगितलेली साधने निश्चीत होती. उदा. पंचशील तत्वे,अष्टांग मार्ग, दहा सद्‌गुण इत्यादी. ही सुचविण्यात आलेली साधने अर्थात माणसाने स्वच्छेने प्रज्ञा आणि शील यांचा सन्मार्ग अनुसरून मतांतर घडवून आणावा यासाठी होती. त्यांच्या मते याउलट साम्यवादाकडून सुचविलेली साधने ही तितकीच स्पष्ट आणि झटपट अंमलात येणारी आहेत. बाबासाहेब येथे नमुद करतात की, साम्यवाद्यांचा हिंसा आणि कामगारांची हुकुमशाही या दोन साधनांवरच विश्वास आहे. साधनांमध्ये दिसणारा हा भेद असला तरी बाबासाहेब त्यात खोलात जातात. बिगर साम्यवादी देशांकडून अवलंबील्या जाणाऱ्या हिंसेकडेही ते लक्ष वेधतात. गौतम बुध्द हे जरी हिंसेविरूध्द असले तरी ते न्यायाच्या बाजुनेही होते. त्यासाठी आवश्यकतेनुसार बळाच्या वापराचीही परवानगी होती.[10] हिंसेच्या या मुद्याच्या बाबतीत बाबासाहेब बुध्दाला स्वीकारून साम्यवाद नाकारतात का ? याबाबतीत बाबासाहेबांशी सहमत असणारे आणि नसणाऱ्यांचे म्हणने काय होते ? याची चिकीत्सा करणे आवश्यक आहे.

हिंसा अहिंसेच्या वादाच्या बाबतीत कॉ.शरद पाटील म्हणतात की, जनआंदोलने उभारण्याचा प्रश्न हा त्याकाळाच्या बाबतीत कधी गौतम बुध्दापुढे आला नाही. यामुळे समाजवादी समाजपरिवर्तनासाठी हिंसा की अहिंसा हा व्यावहारिक प्रश्न गौतम बुध्दांपुढे नव्हता. याबाबतीत ते रावसाहेब कसबेंच्या हिंसा व अहिंसेचा प्रश्न पूर्णतः व्यावहारिक आहे या मताशी सहमत होतात. जातिसंस्था ही केवळ अहिंसेनेच नष्ट होईल हया गृहितकाशी कॉ.शरद पाटील सहमत नाहीत.[11] अर्थात गौतम बुध्दांपुढे जनचळवळीचा प्रश्न नसणे यामुळे त्यांनी हिंसेला बगल देणे हे समाधानकारक उत्तर होऊ शकत नाही. आधुनिक काळासारखी परिस्थिती असती तर गौतम बुध्द हे हिंसेच्या मार्गाने गेले असते का ? याचे उत्तर नकारात्मक येते कारण त्या काळात असे अनेक प्रश्न जे हिंसेने किंवा हिंसात्मक दृष्टिने सोडविले जात होते. शाक्य कोलीय यांच्यातील पाणी प्रश्न, राज्याराज्यांमधील संघर्ष, राज्य गणराज्यामधील संघर्ष, यज्ञविधी ज्यात हजारो पशूंचा बळी दिला जात होता. याबरोबर स्वतः गौतम बुध्दापुढे अनेक जीवघेणे प्रसंग उभे राहिले. तरी समाजात समता प्रस्तापीत करण्यासाठी पर्याय असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक अहिंसेचा मार्ग पत्करला होता हे दिसून येईल. त्यांनी हिंसेला सवलत दिली केवळ व्यवसाय, अन्न म्हणून निकड आणि केवळ इतर अत्यआवश्यक बाबींसाठी. देवदत्तने संघात कठोर नियमांना लागू करण्यासाठी हट्टाने भांडण आरंभले तेव्हा बुध्दाने तो प्रश्न शांततेने सोडविण्याचा प्रयत्न केला मात्र नाइलाज झाल्यावर त्याचा त्याग करणे आवश्यक समजले [12] मात्र कुठल्याही प्रकारे ते आपल्या कार्य सफलतेसाठी व्याकूळ होऊन हिंसेकडे वळले नाहीत. हिंसा आणि अहिंसेच्या ताकदीचा अंदाजाची कल्पना असूनही त्यांनी अहिंसा ही मार्ग म्हणुनच स्वीकारली हे मान्य करावे लागते. आधुनिक काळाचे म्हणायचे तर भारतात हिंसक क्रांतिकारी चळवळीमागे उभा राहणारा अल्प समुदाय आणि अहिंसक जनचळवळीमागे बहुसंख्य भारतीय जनता लक्षात घेतली तर बाबासाहेबांनी बौध्द धर्म स्वीकारायची योग्यता जाणवते.

कार्ल मार्क्स हा खरच हिंसेचा कट्टर समर्थक होता का ? या प्रश्नाची सोडवणूक करणे येथे या निमित्ताने महत्वाचे वाटते. कारण कालपरिवर्तना प्रमाणे बुध्दही हिंसेच्या धोरणाचा स्वीकारकर्ता झाला असता का ? या अशा युक्तीवादापेक्षा हिंसेचा आणि मार्क्सवादाचा संबंधीचा प्रश्न सोडविणे महत्वाचे आहे. कारण आजपर्यंत अनेक मोठ मोठया विद्वावांनानी याबाबतीत मार्क्सवादी तत्वज्ञानावर कठोर टिका केली आहे व त्यास नाकारण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रभाकर वैद्य याबाबतीत म्हणतात की, मार्क्स अहिंसावादी नव्हता पण हिंसावादीही नव्हता. शोषक वर्गाची सत्ता ही हिंसेचा अवलंब करणारी आहे. तीला नष्ट करणे वर्गविहीन समाज निर्मितीसाठी आवश्यक असल्याने किमान बलप्रयोगाची मार्क्सवाद संमती देतो. पण तरी त्याने वेळोवेळी शांततामय मार्गाची महती गायली आहे.[13]

बाबासाहेब याबाबतीत स्वतः मार्क्सवादाला हिंसेबद्दल प्रश्न विचारतात. ते म्हणतात की, साम्यवाद्याना त्यांचे मौल्यवान साध्य प्राप्त करताना इतर मौल्यवान साध्यांचा नाश केला नाही असे म्हणू शकता काय ? या प्रक्रियेत ठार होणाऱ्या लोकांबद्दल म्हणतात की अशा लोकांच्या जीवनाचे मोल नाही काय? मालकांचा प्राण न घेता मालमत्ता घेऊ शकता आली नसती काय ? असे मार्मिक पण आवश्यक प्रश्न याबाबतीत ते मार्क्सवादासमोर उभे करतात.[14]

याउलट लेनिनच्या शासनसंस्था आणि क्रांती या पुस्तकातील मत लक्षात घेतले तर मार्क्सवाद्यांची हिंसेच्या बद्दलची भूमिका स्पष्ट होऊन जाते. ज्यात सुशिक्षित नेमस्त मध्यमवर्गियांचा संधिसाधु विचार म्हणजे 'पायरीपायरीने अधिकाधिक लोकशाहीकडे' प्रगती ही आपोआप आणि शांततेच्या मार्गाने होते या विचाराला लेनिने अशक्य मानलेले

आहे. लेनिनच्या मते कम्युनिझमकडे वाटचाल कामगाराच्या अधिसत्तेशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने होणार नही. शोषण करणाऱ्या भांडवलदारांच्या विरोधासाठी अन्य कोणताही मार्ग उपयोगी नाही असे मत व्यक्त करून लेनिनला हिंसेची अत्यआवश्यकता साम्यवाद प्रस्तापित करताना दाखवायची आहे.[15] याचा अर्थ असा नाही की ती गोष्ट भारतासारख्या देशालाही लागू होईल. साम्यवादी क्रांती आणण्यासाठी रशिया आणि चीन मध्ये फक्त एकदाच हिंसा करून भागलेले नाही. तिचा अंमल सर्वत्र पसरविण्यासाठी आणि साम्यवाद लोकांचा गळी उतरविण्यासाठी सतत शस्त्र साम्यवादी देशांमध्ये उगारावे लागले. लोकांना हिंसात्मक मार्गाने झालेला बदल हा सहजासहजी स्वीकारलेला दिसत नाही. समानता आणण्यासाठी व्यक्तींची हुकुमशाही जगाला बघावी लागली आहे. याउलट केरळ आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये साम्यवादी सरकार स्वीकाराची मानसिकता लोकशाहीमार्गानेच झालेली दिसते. हिंसात्मक चळवळीने वा रक्त सांडून नाही. याबाबतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अहिंसात्मक मार्गाने मानवात बदल करून समानता आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या बुध्दाला आणि बौद्ध धर्माला स्वीकारणे योग्य समजले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मच का नाकारला नाही ? असा प्रश्न उभा राहतो. याबाबतीत प्रभाकर वैद्य यांनी धर्म हवाच कशाला ? या शिर्षकाखाली बाबासाहेबांमार्फत याचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतानुसार बाबासाहेबांना हिंदु धर्म आणि इतर धर्मांच्या चांगल्या आणि वाईटपणाचा अंदाज आला असतानाही माणसाला आणि माणसांनी बनलेल्या समाजाला धर्म पाहिजे हे त्यांचे मत पक्के असल्याचे मानुन हिंदु धर्म सोडल्यावर धर्मच नको, अशी भुमिका घेऊ शकले नाहीत.[16] याबरोबर अजुन खोलात जाऊन जर एंगेल्सची धर्माबद्दलची भूमिका ध्यानात घेतली तर अजुन याचा उलगडा होतो. धर्म व धर्माच्या माध्यमातून होणारे बहुसंख्य जनतेचे शोषण आणि धर्म ही अफुची गोळी आहे असे मार्क्सवादाचे सूत्र असतानाही, एंगेल्सने धर्माला लोकांमधून त्वरीत हद्दपार करण्याला आक्षेप घेतला होता. त्याच्या मतानुसार निरीश्वरवादीपणाचा गाजावाजा करून शपथ घेतली पाहीजे असा दंडक पक्षाच्या जाहीरनाम्यात ठेवणे म्हणजे घोडचूक ठरणार याबरोबर धर्माविरूध्द घोर लढा पुकारण्याचा अट्टाहास करणाऱ्यांची त्याने कानउघाडणी केली.[17] यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, धर्माच्या मर्यादा आणि दोषांची जाणीव असुनही धर्मविरोध लोकांच्या गळी उतरविण्याची घाई करण्याचा अव्यावहार्यपणा एंगेल्समध्ये नव्हता तसा तो डॉ.बाबासाहेबांमध्येही नव्हता. याउलट युरोपच्या तुलनेत धर्माच्या बाबतीत भारतात जास्तच काळजी घेण्याची गरज होती. यामुळे बाबासाहेबांनी धर्माला धर्म हा का पर्याय म्हणून दिला. याचे स्पष्ट उत्तर मिळते.

बाबासाहेबांनी जरी बौद्ध धर्माला तुलना करून निवडले तरी त्यांच्या ह्रदयात मार्क्सवादाला अढळ असे स्थान होते. 15 ऑक्टोंबर 1956 ला म्हणजे बौध्द धर्माची दिक्षा घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी जे उद्बोधक भाषण त्यांनी दिले त्यात एका ठिकाणी नमुद केलेकी बुद्धापेक्षा कार्ल मार्क्सने वेगळे काय सांगितले ?[18] याचा एकच अर्थ निघतो की बाबासाहेब हे आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत मार्क्सवादापासून दुरावले नव्हते. गेल ऑम्व्हेट म्हणतात बौद्ध धर्माच्या अभ्यासाच्या खोलीने बाबासाहेबांना एक पर्याय मिळाला.[19] जो धर्माची निकड म्हणून आवश्यक ठरला.

साम्यवादी तत्वज्ञानाची दखल घेणे बाबासाहेबांनी बौध्द धर्माच्या स्वीकारल्यावरही आवश्यक मानले होते. ते म्हणतात की जो धर्म साम्यवादाला उत्तर देऊ शकणार नाही तो जीवंत राहू शकत नाही.[20] बाबासाहेंब सामाजिक आणि धार्मिक क्रांतीला निरातिशय महत्व द्यायचे. भारतच नाहीतर संपूर्ण आशियाई देशात या गोष्टीची त्यांना गरज वाटत होती. काठमांडूच्या जागतिक बौध्द धर्म परिषेदेत बौद्ध भिख्खुंची कानउगाडणी करत त्यांना साम्यवादी

हुकुमशाहीपासून वाचण्यासाठी कार्ल मार्क्सची पात्रता अंगी आणावी असा संदेश दिला. कसबे साम्यवादाला आधार हा बौद्ध धर्म झाला असता पण तसे रशियाकडून न झाल्यावर बाबासाहेबांना दुःख झाल्याची नोंद करतात. जनमताच्या मूल्यांशी संवाद साधणे हे समाजवाद चिरंजीव होण्यासाठी आवश्यक आहे व यासाठी बौध्द धर्माइतके प्रभावी साधन नाही असे बाबासाहेब मानायचे.[21] बाबासाहेबांना मार्क्सवाद आणि बौद्ध धर्म या दोघांना एकमेकांची गरज कायम राहणार असल्याचे असल्याचे सुचवायचे आहे.

**निष्कर्ष**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मार्क्सवादाविषयीच्या विचारांना बौध्द धर्माच्या तुलनेच्या अनुषंगाने जाणून घेतल्यावर एक गोष्ट लक्षात येते की, मार्क्सवाद बाबासाहेंबानी पूर्णपणे नाकारला नाही आणि बौध्द धर्मही त्यांनी आहे असा स्वीकारला नाही. मार्क्सवादातील चुकांचा शोध घेताना त्यांच्या मतात कुठेही कटुता वा शत्रुत्व आले नाही. याउलट बौद्ध धर्मियांना आणि भिख्खुंना मार्क्सवादाचे महत्व पटवून देताना कुठेही कमीपणा वाटून घेतला नाही. बारकाईने याचा अभ्यास करणाऱ्यांना एक गोष्ट जाणवेल की, बाबासाहेबांनी गौतम बुध्द आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांच्या बाबतीत एक वेगळेच संतुलन ठेवले होते. बौध्द धर्माचा स्वीकार काळाची निकड आपल्या बहुसंख्य दलित बांधवासाठीची होती. आजच्या काळात बाबासाहेबांनी फक्त काही मार्क्सवादी तत्वांना नाकारले म्हणून त्यांचे विरोधक होते असे म्हणण्याची गरज नाही. आणि बौध्द धर्माचे कट्टर समर्थक म्हणून बौध्द तत्वज्ञानाला बंदिस्त करून टाकण्याचीही आवश्यकता नाही. हेच निमित्ताने सांगावेसे वाटते.

**संदर्भ**

1. डॉ.आंबेडकर बाबासाहेब, बुध्द आणि मार्क्स, प्रबुध्दभारत प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती 14 ऑक्टो.2012. पान.नं.6,7.
2. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती जुलै.2017, पान नं.311,312
3. डॉ.आंबेडकर बाबासाहेब, उपरोक्त, पान.नं.8
4. उपरोक्त, पान.नं.9
5. उपरोक्त, पान.नं.10
6. कॉ.पाटील शरद, मार्क्सवाद–फुले–आंबेडकरवाद,सुगावा प्रकाशन.पुणे–1993 पान.नं. 135 ते 136
7. डॉ.आंबेडकर बाबासाहेब, उपरोक्त, पान.नं.9
8. उपरोक्त, पान.नं.11
9. वैद्य प्रभाकर, डॉ.आंबेडकर आणि त्यांचा धम्म, सुगावा प्रकाशन.पुणे.23 मे 2005.पान.नं.169
10. डॉ.आंबेडकर बाबासाहेब, उपरोक्त, पान.नं.12 ते 18
11. कॉ.पाटील शरद, उपरोक्त, पान.नं.143
12. केळूसकर कृष्णराव अर्जुन, गौतम बुध्दाचे चरित्र, नागनालंदा प्रकाशन वाळवा,सांगली, संपादकीय आवृत्ती 2012.पान.नं.133 ते 135
13. वैद्य प्रभाकर, उपरोक्त, पान.नं.168
14. डॉ.आंबेडकर बाबासाहेब, उपरोक्त, पान.नं.19

15. लेनिन व्ला.इ., प्रगती प्रकाशन,मॉस्को,1976 पान.नं.108
16. वैद्य प्रभाकर, उपरोक्त, पान.नं.55,56
17. .अनुवादक-बेडेकर दि.के., धर्म( कॉ.लेनिन यांचे धर्मविषयक काही लेख), लोकवाङ्‍्‍मय गृह,मुंबई, पाचवी आवृत्ती. जाने. 2013.पान नं.7
18. डॉ.आंबेडकर बाबासाहेब,बुध्द धर्मानेच जगाचा उध्दार होणार आहे ( 15 ऑक्टोंबर 1956 नागपुर येथील भाषण), लोकराज्य अंक आठवा, ऑक्टों.2006, पान.नं.5 ते 10
19. ऑम्वेट गेल, भारतातील बौध्दधम्म,सेझ प्रकाशन इंडिया प्रा.लि.मुंबई. 2003, पान.नं.33
20. .कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन,पुणे, तृतीय आवृत्ती जुलै.2017, पान नं.288
21. कांबळे उत्तम, रावसाहेब कसबे यांचे क्रांतीकारी चिंतन, सुगावा प्रकाशन,पुणे., प्रथमावृत्ती जून 2006.पान.नं. 49,50